# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

दिनांक २५.०८.२०२२

## अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २३/०८/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १२४ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ७७,८५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

## पोलीस अधीक्षक कार्यालय येथे शालेय विदयार्थ्यांना पोलीस दलाविषयी मार्गदर्शन देवुन सायबर गुन्हयासंदर्भात जनजागरूती करण्यात आली:—

दिनांक २४/०८/२०२२ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय, हिंगोली येथे जिल्हा परिषद शाळा हट्टा तसेच जवळा बाजार येथील शालेय विदयार्थ्यांना पोलीस दलात चालणारे कामकाजा विषयी माहिती देवुन त्यांना सायबर गुन्हयांचे प्रकार व त्यापासुन आपला बचाव कसा करावा या विषयी मा. पोलीस अधीक्षक एम. राकेश कलासागर यांचे मार्गदर्शनात सायबर सेल येथील महिला पोलीस उपनिरीक्षक भाग्यश्री कांबळे तसेच पोलीस अंमलदार प्रमोद थोरात, जयप्रकाश झाडे, दत्तात्रय नागरे, रोहित मुदीराज, सुमीत टाले, इरफान पठान व रमा ठोके यांनी सायबर गुन्हयासंदर्भात सविस्तर माहिती दिली.


हिंगोली जिल्हा पोलीस


हिंगोली जिल्हा पोलीस